जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांसाठी सुधारित धोरण.

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**शासन शुध्दीपत्रक क्रमांकः जिपब-४८१७/प्र.क्र.०७/आस्था-१४**

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,

फोर्ट, मुंबई-४००००१.

दिनांक :- ०८ मार्च, २०१९

# शासन शुध्दीपत्रक

**वाचा :-**

१) शासन निर्णय क्र. जिपब-४८१७/प्र.क्र.७/आस्था-१४ दि.२२ फेब्रुवारी,२०१७.

२) शासन शुध्दीपत्रक क्र. जिपब-४८१७/प्र.क्र.७/आस्था-१४ दि.१५ एप्रिल,२०१७.

३) शासन शुध्दीपत्रक क्र. जिपब-४८१७/प्र.क्र.७/आस्था-१४ दि.१७ मे,२०१७.

४) शासन शुध्दीपत्रक क्र. जिपब-४८१७/प्र.क्र.७/आस्था-१४ दि.३१ मे,२०१७

**प्रस्तावना:-**

जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्या संगणकीय प्रणालीव्दारे करण्याकरीता शासनाने दि.२७/०२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये सुधारित धोरण निश्चित केले. ज्यामध्ये बदलीपात्र शिक्षकाची व्याख्या करतांना संबंधित शिक्षकाची सर्वसाधारण व अवघड क्षेत्रात १० वर्षाची सेवा झाली असल्यास असे शिक्षक बदलीपात्र होतात. मात्र सर्वसाधारण क्षेत्रातील बदलीपात्र शिक्षक एकदा बदली झाल्यानंतर तो जोपर्यंत अवघड क्षेत्रात जात नाहीत, तोपर्यंत असे शिक्षक बदलीस पात्र ठरतात. नवीन धोरणानुसार त्यांची प्रतिवर्षी बदली होवू शकते. औरंगाबाद खंडपीठात शिक्षकांच्या बदल्यांच्या अनुषंगाने मा. न्यायालयाने एक मुद्दा उपस्थि.त केला होता. ज्यामध्ये बदलीपात्र शिक्षकाची नवीन धोरणानुसार प्रतिवर्षी बदली होवू शकते, त्यामुळे त्या शिक्षकाला एकदा बदली झाल्यानंतर पुन्हा बदली होण्यासाठी काही कालावधी निश्चित केला जाणार आहे काय? अशी शासनाच्या वकीलांना विचारणा केली होती. त्यावेळी शासनाच्या वतीने अशा बदलीपात्र शिक्षकाची संगणकीय प्रणालीव्दारे एकदा बदली झाल्यानंतर पुन्हा ३ वर्ष त्या शिक्षकाची बदली केली जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले.

**शासन शुध्दीपत्रक :-**

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, आता शासन निर्णय दि.२७/०२/२०१७ मधील व्याख्या या शिर्षकाखालील बदलीपात्र शिक्षकाच्या व्याख्येत खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

**“बदलीस पात्र शिक्षक म्हणजे ज्या शिक्षकाची बदलीस निश्चित धरावयाची सेवा १० वर्ष पूर्ण झाली आहे आणि विद्यमान शाळेत सदर शिक्षकाची सेवा किमान ३ वर्ष पूर्ण झाली आहे.”**

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०७२०३०१५२४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Priyadarshan S Kamble

Digitally signed by Priyadarshan S Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f18890edb030995db4323c71a3bdecddde94daa5425bbe713b2e2a5b7d6fa779, cn=Priyadarshan S Kamble
Date: 2019.03.08 20:10:24 +05'30'

( प्रि.शं.कांबळे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव,मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधानपरिषद महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय , मुंबई
६) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व अपरमुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग
८) सर्व विभागीय आयुक्त
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०) उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)
११) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.

१२) सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

१३) निवड नस्ती कार्या क्र.आस्था-१४, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२